करण्यात आले त्यासाठी उद्घाटक म्हणून प्रा डॉ प्रवीण खोडे, टोम्पे महाविद्यालय, चांदुर बाजार याना आमंत्रित करण्यात आले होते तर ह्या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ आर ए उमेकर होते. या कार्याक्रमाचे प्रास्ताविक प्रा डॉ एन एन धोंडगे यांनी केले तर प्रा ए एस ढोके यांनी उपस्थितांचे आभार व्यक्त केले. या कार्यक्रमाचे संचालन प्रा सौ झवर ह्यांनी केले. ह्या संपूर्ण कार्यक्रमासाठी प्रा शेळके, प्रा स्वप्नील भेंडे , प्रा कु अपेक्षा दुबे, प्रा कु विशाखा पाटील, प्रा कु बदुकले, प्रा कु.पूजा वासणकर, प्रा कु.पूनम भिंगारे, प्रा कु.हर्षाली वांगे यांनी कार्यक्रम पूर्णत्वास नेण्यासाठी कार्य केले.

वाणिज्य विभागाच्या २३/०८/२०१९ रोजी "शासनाचे युवा माहिती दूत app " या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी श्री चेतन कानेरकर ,कांडली याना प्रमुख वक्ते म्हणून बोलावण्यात आले होते. शासनाने आपल्या विविध योजना लोकांपर्यंत पोहचविण्यासाठी, लोकाना सामाजिक विकासाच्या योजनांची माहिती होण्यासाठी विविध app ची निर्मिती केलेली आहे. ह्या app च्या माध्यमातून आपण कुठली योजना कोणत्या व्यक्तीसाठी आहे याची माहिती घेवू शकतो तसेच विद्यार्थ्याना त्यांच्या उपयोगाच्या शासकीय योजना कोणकोणत्या आहेत त्याचा त्यांनी फायदा कसा घ्यावा यासाठी ह्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते या कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ अ पी घोगरे होते तर कार्याक्रमाचे प्रास्ताविक प्रा डॉ एन एन धोंडगे यांनी केले तर प्रा कु पूजा वासनकर नी उपस्थितांचे आभार व्यक्त केले. या कार्यक्रमाचे संचालन प्रा कु हर्षाली वांगे ने केले.

वाणिज्य विभागाच्या 11/09/2019 रोजी "पोस्ट ऑफिसच्या विविध योजनांबाबत माहिती आणि पोस्ट ऑफिसमध्ये बचत खाते सुरु करण्याबाबत कार्यक्रम" या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. या कार्यक्रमामध्ये श्री सुयश साळुंके, पोस्ट कार्यालय प्रमुख अधिकारी यांनी पोस्ट ऑफिसच्या विविध योजनांबाबत माहिती दिली जसे सुकन्या योजना, आर डी, पीपीएफ, एन एस सी, केव्हीपी इत्यादी योजनांचे फायदे सांगितले व सध्या पोस्ट सुध्दा डिजीटल युगात प्रगत झाले आहे, पोस्टामध्ये १०० रु ठेवीवर एक बचत खाते सुरु केल्या जाते व आपल्या android मोबाईलच्या माध्यमातून आपण त्या खात्यावरून विविध online व्यवहार करू शकतो.ज्यामुळे आपला वेळ वाचेल, पैसा वाचेल व त्या सर्व व्यवहारापासून भारत सरकारला उत्पन्न मिळेल.अशा प्रकारचे सविस्तर मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ ए पी घोगरे होते तर कार्याक्रमाचे प्रास्ताविक प्रा ए एस ढोके यांनी केले तर प्रा डॉ शेळके यांनी उपस्थितांचे आभार व्यक्त केले. या कार्यक्रमाचे संचालन प्रा कु पूजा वासनकर ने केले.

वाणिज्य विभागाच्या वतीने विद्यार्थ्यांच्या तांत्रिक ज्ञानात वाढ व्हावी यासाठी महाविद्यालय स्तरावर निःशुल्क M S Power Point या विषयावर Certificate Course चे 06

